निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८८ वा
रविवार -०१ जून २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा आदर्श घेत राज्य शासन वंचितांच्या कल्याणासाठी काम करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर/ प्रतिनिधी/** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य व विचार आजही राज्यव्यवस्थेला मार्गदर्शक आहेत. अहिल्यादेवी होळकर यांनी न्यायदानाची आदर्श व्यवस्था भक्कमपणे उभी केली. अन्यायग्रस्तांना न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या प्रजाहितदक्ष, राज्यकारभाराचा आदर्श समोर ठेऊन राज्य शासन देखील वंचितांच्या कल्याणासाठी काम करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.श्रीक्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अहिल्यादेवींनी २८ वर्षं राज्यकारभार केला. त्यांनी केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती घडवली. मंदिरांचे पुनरुज्जीवन, घाटांचे बांधकाम, धर्मशाळांची उभारणी, गरीब जनतेसाठी पाणीपुरवठ्याची यंत्रणा आणि महिला सक्षमीकरणाचे कार्य त्यांनी अत्यंत समर्पित वृत्तीने केले.

अहिल्यादेवी होळकर यांनी काशी, अयोध्या, मथुरा, पंढरपूर, नाशिक, जेजुरीसह देशभरातील धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार त्यांच्या स्वतःच्या निधीतून केला. त्यांनी सोमनाथ येथील मंदिर नव्याने बांधले. घाट, मंदिरे बांधताना, दानपुण्य करतांना सरकारी तिजोरीतून खर्च न करता स्वतःच्या संपत्तीतून खर्च केला. एवढी श्रीमंती असतानाही त्या योग्याप्रमाणे जीवन त्या साधेपणाने जीवन जगल्या. त्यांनी स्वतःसाठी धन खर्च केले नाही, तर समाजाच्या कल्याणासाठी खर्च केले, म्हणून त्या 'लोकमाता' ठरल्या.

> **श्री-क्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सोहळा संपन्न**

महिला सक्षमीकरण आणि आदर्श न्यायदान

गोरगरिबांना रोजगार मिळवून देण्यासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी माहेश्वर येथे त्यांनी एक मोठे वस्त्रउद्योग केंद्र उभारले, तेथे माहेश्वरी वस्त्र तयार होऊ लागले. त्यांनी एक समृद्ध अर्थव्यवस्था उभी केली. महिला सैनिकांची स्वतंत्र तुकडी निर्माण करणाऱ्या त्या पहिल्या महिला शासक होत्या. त्यांच्या सैन्यदलात शिस्त होती, कौशल्य होतं, आणि युद्धसज्जतेसाठी त्यांनी स्वदेशी तोफांचं उत्पादनही सुरू केलं. न्यायपद्धतीमध्ये त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगतीशील होता. अहिल्यादेवींची आदर्श न्यायदानाची व्यवस्था भक्कमपणे उभी केली. अन्यायग्रस्तांना न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. सर्वसामान्यासारखे न्यायदान करतांना हुंडाबंदी केली. महिलांचे जीवन समृद्ध करण्याचे कार्य त्यांनी केले.

**श्रीक्षेत्र चौंडी विकासासाठी ६८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र, कार्य आणि आदर्श आज ३०० वर्षांनंतरही तितकंच प्रभावी आणि प्रेरणादायी आहे. त्यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्ताने शासनाने ६८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार केला आहे. त्यांच्या नावाने एक भव्य स्मारक, महिला सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान', आणि त्यांच्यावर आधारित एक बहुभाषिक चित्रपट तयार करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. या माध्यमातून त्यांचे कार्य देशभरात पोहोचविले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अहिल्यादेवी होळकर यांचे प्रजाहिताचे धोरण राबविण्यावर शासनाचा भर - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान चौंडी मराठी संस्कृतीचे जागृत देवस्थान आहे. लोककल्याणकारी राज्य, सुराज्य जगाला दाखविण्याचे काम अहिल्यादेवींनी केले. अहिल्यादेवींनी सर्वसामान्य माणसांच्या विकासाचे काम केले.

त्यांनी धर्मरक्षणासाठी आयुष्य समर्पित केले. महिलांसाठी सैनिक तुकडी सुरू करण्याची त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवण दिली आहे.अहिल्यादेवी निष्पक्ष व न्यायप्रिय राजमाता होत्या. प्रजेसाठी रोजगार निर्माण करण्याची दूरदृष्टी अहिल्यादेवींकडे होती. त्यांनी रस्ते, पूल व घाट बांधले. अहिल्यादेवींचे प्रजाहिताचे धोरण आज शासन राबवित आहे. याच व्यासपीठावरून जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्शावर शासन काम करत आहे. चौंडी विकासासाठी जो काही आवश्यक निधी लागणार होता, तो देण्याचे काम शासनाने केले आहे.आज आपण लेक लाडकी म्हणतो तसे सूनही लाडकी मानली पाहिजे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कधीही बंद केली जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.



प्रास्ताविकात प्रा. राम शिंदे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती शासनाच्यावतीने २०१७ पासून साजरी करण्यात येत आहे. श्रीक्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीस्थळासाठी शासनाने ६८१ कोटी रुपये मंजूर करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मागणी केल्यानंतर अवघ्या १६ महिन्यांच्या कालावधीतच जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, आज देशभरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली जात आहे.

जिल्ह्यातील एक लाख एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी जिल्ह्यात प्रकल्प राबविण्यात येणार आहे. श्रीक्षेत्र चौंडी विकासासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले.क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्श समोर ठेवीत शासनाने लोकहिताचे अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. धनगर समाजातील नागरिक, विद्यार्थ्यांना सवलती मिळाव्यात यासाठी राज्य शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत. अहिल्यादेवी होळकरांचा वारसा जपण्यासाठी श्रीक्षेत्र चौंडीच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे.

**आमदार गोपीचंद पडळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.**

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती सोहळ्याच्या निमित्ताने लोकराज्यचा विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित इतर विशेषांक आणि पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला आमदार गोपीचंद पडळकर, मोनिकाताई राजळे, शिवाजीराव कर्डीले, सुरेश धस, आमदार विठ्ठलराव लंघे, काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, माजी मंत्री अण्णा डांगे, बबनराव पाचपुते, स्नेहलता कोल्हे, रमेश शेंडगे, प्रा. लक्ष्मण हाके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.

---

## नूतन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी कार्यभार स्वीकारला

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** नूतन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला. सेवानिवृत्त होत असलेले विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्याकडून त्यांनी पदभार स्विकारला.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर आयुक्त अनंत गव्हाणे, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी श्री पापळकर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.यावेळी नगरविकास विभागाचे सहआयुक्त देविदास टेकाळे यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत विभागातील माहिती जाणून घेतली.नवनियुक्त विभागीय आयुक्त पापळकर हे २०१० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला जिल्हाधिकारी, हिंगोली जिल्हाधिकारी, धुळे जिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे.



---

## राजधानीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रात साजरी करण्यात आली. कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव आर.विमला यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश आडपवार, श्रीमती स्मिता शेलार यांच्यासह उपस्थित त्यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.यावेळी कस्तुरबा गांधी मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याजवळ आयोजित कार्यक्रमात राज्याचे माजी मंत्री महादेव जानकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी जानकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या अतुलनीय कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला, सहायक निवासी आयुक्त, डॉ राजेश आडपावार, स्मिता शेलार यांच्यासह उपस्थित महाराष्ट्र सदनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयास पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



**महाराष्ट्र परिचय केंद्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन**

महाराष्ट्र परिचय केंद्रात आयोजित कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यात आले. परिचय केंद्राच्या उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यालयात उपस्थित कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

---

## भाजपनं धोका दिला, त्यांच्यासोबत युती करणं आमची चूक, जानकरांचा हल्लाबोल

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** भाजपसोबत युती करणे ही आमची चूक होती, कारण, त्यांनी आम्हाला धोका दिल्याची टीका राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी केली. फुले शाहू आंबेडकर यांचे राज्य देशावर असायला हवे असेही जानकर म्हणाले. ज्यांनी धोका दिला त्यांना परास्त करणार असल्याचा इशारा देखील जानकरांनी दिला आहे. मी अजित पवारांकडे युती करण्याचा प्रयत्न केला होता, पण काय झालं माहिती नाही असेही जानकर म्हणाले. दिल्लीतील महाराष्ट्र सदनामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली होती. यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ देखील उपस्थित होते. यावेळी बोलताना महादेव जानकर यांनी काँग्रेससोबत युती करण्याचे संकेत दिले आहेत. आपली युती होऊ शकते सपकाळ साहेब असं वक्तव्य जानकर यांनी केलं आहे.

आज राहुल गांधी, शरद पवार येणार म्हणाले होते पण आले नाहीत. हर्षवर्धन सपकाळ आल्याचे जानकर म्हणाले. हर्षवर्धनजी हमे लंबा चलना है, जयंती तो बहाना है, दिल्ली मे सरकार लाना है असे म्हणत महादेव जानकर यांनी सत्ताधाऱ्यांना एक प्रकारे इशाराच दिला आहे. निधन झाल्यावर माझा मृतदेह दिल्लीतच राहणार

निधन झाल्यावर माझा मृतदेह दिल्लीतच राहणार असल्याचे महादेव जानकर म्हणाले. राज्याचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची बॉडी कराडला गेली होती.

---

## पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे ही आपली सर्वांची जबाबदारी - पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर/ प्रतिनिधी/** देशाचे जबाबदार नागरिक म्हणून पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रदूषण कमी करणे, तसेच वन्यजीव आणि वनस्पतींचे संरक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. हा कार्यक्रम धार्मिक स्थळाच्या परिसरात पर्यावरणपूरक सवयी रुजविण्या बरोबरच पुढच्या पिढ्यांसाठी स्वच्छ आणि हरित भविष्य घडवण्याच्या दृष्टिकोनातून महत्वाचे पाऊल ठरणार असल्याचा विश्वास पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.आज मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर परिसरात नागरिकांमध्ये सिंगल युज प्लास्टिक टाळण्याचे आवाहन तसेच सिंगल यूज प्लास्टिक बंदीबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री श्रीमती. मुंडे बोलत होत्या. या कार्यक्रमास सिद्धिविनायक मंदिर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, सिंगल युज प्लास्टिकचा भस्मासुर रोखायलाच हवा, सिंगल युज प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे याकरिता सिंगल युज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्यासाठी संकल्प, संयम आणि प्रत्यक्ष कृती याची नितांत गरज आहे. शासन स्तरावर सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना आळा घालण्यासाठी वेळोवेळी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. यासाठी विभागामार्फत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी प्रभावी धोरणे आणि नियम ही लागू करण्यात आले आहेत. सिंगल यूज प्लास्टिकवर निर्बंध घालण्याबरोबरच, जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी शाळा, कॉलेज, आणि सार्वजनिक ठिकाणी जागरूकता मोहिम देखील राबवल्या जात आहेत. कार्यशाळा, चर्चासत्रे, आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवर्धनाचा संदेश पोहोचवला जात आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमाअंतर्गत मंत्री पंकजा मुंडे यांनी सिद्धिविनायक मंदिर परिसरातील स्टॉलधारकांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबवण्याचे सांगत स्वत: कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे वळण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमाच्या वेळी प्लास्टिकच्या पर्यायांविषयी माहिती देणारे सूचना फलकांबरोबरच पर्यावरण जनजागृतीच्या घोषवाक्यांनी मंदिर परिसराचे वातावरण दुमदुमून गेले. पर्यावरण रक्षणासाठी शासन, संस्था आणि नागरिकांनी एकत्र येवून काम केल्यास नक्कीच सकारात्मक बदल दिसून येतील असेही मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.यावेळी सिद्धिविनायक ट्रस्टने सुद्धा प्लास्टिक बंदीसंबंधी जनजागृती कार्यक्रमात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



# बदलत्या हवामानामुळे वेळेच्या आधी येणाऱ्या पाऊसाचे थैमान!

बदलत्या हवामानामुळे पाऊसाने सुध्दा आपली दीनचर्या बदलल्याचे दिसून येते. वेळेच्या आधी पाऊसाने राज्याच्या अनेक भागांत आक्राळ-विक्राळ रूप धारण केल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान,विज कोसळुन मृत्यूची संख्या,पशुधनाचे नुकसान झाले,पुरपरिस्थिति अशा गंभीर दुर्घटना व समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.मे महिन्यातच राज्याच्या अनेक भागात रेड अलर्ट तर काही भागात ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे म्हणजेच पुढे चालून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्याचप्रमाणे बदलत्या हवामानामुळे आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे देशात अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी, सुनामी हा प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहे.म्हणजे भारतात उन्हाळा,पाऊसाळा आणि हिवाळा असे तीन ऋतू आपले नियमित कार्य करायचे. परंतु बदलत्या हवामानामुळे संपूर्ण ऋतूंनी आपली दिनचर्या बदलल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळेच आतापासूनच राज्यासह देशात पाऊसाने विक्राळ रूप धारण केले आहे.यंदा हवामानाच्या अंदाजानुसार (जून ते सप्टेंबर) या कालावधीत सरासरीपेक्षा अधिक म्हणजे देशभरात १०६ टक्के पाऊस कोसळणार असल्याचे सांगितले जाते.यंदाचा महाराष्ट्रातील वरूणराजाचा अंदाज जाहीर झाला असून कोकण-गोवा १०७ टक्के पाऊस, मध्य महाराष्ट्र ११० टक्के पाऊस, मराठवाडा ११२ टक्के पाऊस, विदर्भ १०९ टक्के पाऊस या पेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. म्हणजेच पावसाचा काळ अत्यंत गंभीर आहे.परंतु सध्या वेळेच्या आधीच अती पाऊस आल्याने महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत मोठी तारांबळ उडाल्याचे दिसून आले. परंतु सध्या महाराष्ट्रात पाऊसाचा जोर कायम असून विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, मुंबई, रायगड इत्यादी भागात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले असून अनेक भागांत तारांबळ उडाल्याचे दिसून आले व अनेक भागात पुरपरिस्थिति निर्माण झाल्याचे दिसून आले.सध्याच्या परिस्थितीत विदर्भ अलर्ट मोडवर असुन मराठवाड्यातील अनेक भागांत पुरपरिस्थिति आहे.देशात आतापर्यंत आलेल्या पावसाच्या तुलनेत २५ वर्षांच्या काळातील ही सातवी वेळ आहे.यावर्षी पाऊसाचा सांगितलेला अंदाज हा २०१३ प्रमाणेच असल्याचे सांगितले जाते म्हणजेच यावर्षी पाऊस उग्र रूप धारण करू शकतो. सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की पुर्वीची परिस्थिती आणि आताच्या परिस्थितीमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे.पुर्वी पाणी जमिनीत मुरायचे त्यामुळे पुरपरिस्थिती लवकर निवळायची.परंतु वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलतोड ,अत्याधुनिकरण व मोठ्या प्रमाणात सिमेंटरोडचे जाळे यामुळे राज्यासह देशातील अनेक भागांत जमिनीत पाणी मुरत नसल्याने राज्यासह देशातील अनेक भागांत आपल्याला थोड्याशा पावसातच पुरपरिस्थिती दिसून येते. त्यामुळे राज्यासह देशात येणाऱ्या पावसाचा अंदाज पहाता राज्य प्रशासनाने व केंद्र प्रशासनाने सतर्क राहाने गरजेचे आहे. सध्या सुरू असलेल्या अती पावसामुळे राज्यात आतापर्यंत ४ दिवसांत २१ लोकांचा मृत्यू झाला असून १२ पेक्षा अधिक गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते ही अत्यंत गंभीर बाब आहे.यापुढे येणारा काळ पाऊस किंवा उष्णतामान यात मोठ्या प्रमाणात वाढ होणार असून अत्यंत गंभीर समस्या निर्माण होवू शकतात.सध्या बरसलेल्या धो-धो पावसावरून हवामान खात्याच्या शास्त्रज्ञांतच झालेला पाऊस मोसमी की वळिवाचा (अवकाळी) याबाबत एकमत होत नसुन चांगलीच जुंपल्याचे चित्र चर्चेत आले आहे.कारण मे महिन्यातील पाऊस हा वाजवीपेक्षा अधिक झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.सुरू असलेला पाऊसाचे थैमान व येणाऱ्या पावसाचा अंदाज पहाता स्थानिक प्रशासन, राज्य प्रशासन व केंद्र सरकारने आतापासूनच सतर्क राहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण वाढत्या शहरीकरणामुळे ड्रेनेज सिस्टीम सुधारणे गरजेचे आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत एखाद्या पावसामध्येच पुरपरिस्थिती निर्माण झाल्याचे आपण उघड्या डोळ्यांनी पाहीले आहे.त्यामुळे येणाऱ्या पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी सरकारने आतापासूनच युध्दपातळीवर कार्य करने अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे बदलत्या हवामानामुळे अती पावसाची शक्यता पाहता शेतकरी, शेतमजूर, नदी काठावरील रहाणारे नागरिक, तलावाच्या काठावर रहाणारे नागरिक, वाहन चालक यांनी येणाऱ्या पावसापासून व विजेपासून सावधगिरी बाळगावी.

लेखक,रमेश कृष्णराव लांजेवार

# लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा!

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७७ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे.

एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत.

खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे.

जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७७ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# प्रजाजनांसाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी

अहिल्यादेवी स्वातँय भारतातील, माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मृत्युपर्यंत त्या तिथेच वास्तव्यात होत्या. मल्हाररावांनी त्यांना आधीच प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केल्यामुळे त्या धाडसी बनल्या होत्या. त्यामुळे त्या लढाईत स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकाजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली. अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर कुम्हेटेच्या लढाईत मृत्यु पावल्यानंतर त्याकाळी सती जाण्याची प्रथा अस्तित्वात होती. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी विरोध केला. साम्राज्याचा कारभार सांभाळावा असे त्यांनी सुचविले. माळवा प्रांताचा कारभार बघत असतांना सासरे मल्हारराव होळकर यांचे देखील दुःखद निधन झाले. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाई दरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा, तेथे तुम्ही ४-५ दिवस मुक्काम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांच्या शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा

पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्य कारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूर मधील त्यांचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला, तो एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुध्दिचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती. आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना तत्त्वज्ञानी राणी असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक तत्त्वज्ञानी राजा भोज यांच्याशी असावा.

अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे. वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती व युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यावरच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते, असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे. भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना नेमले. त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) माल्कम यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्याकाळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्त्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या. शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले. मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यांनाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती . ग्रंथ संपदा- निर्मिती छापखाने नसल्याने त्याकाळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते वरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्याप्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्द्येची महत्त्व जाणत असल्याने त्यांच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट प्रथा कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणांस येते. त्याकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, यवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखलं प्रसिंध्द हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोकं या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेसाठी कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर अहिल्यादेवीच्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता, त्यास चाकरीत घेऊन तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. भारतीय संस्कृती कोषात अहिल्यादेवीनी केलेल्या बांधकामांची यादी आहे - काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते. अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. त्यांच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याचा मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तक विधानाचा कार्यक्रम स्वतः आयोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा अहेर दिला.

अहिल्यादेवींच्या सन्मानाप्रित्यर्थ व स्मृतिप्रित्यर्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट १९९६ रोजी एक टपाल तिकिट जारी केले. या अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव देवी अहिल्याबाई विमानतळ असे ठेवण्यात आले आहे. तसेच, इंदूर विद्यापीठास देवी अहिल्या विश्वविद्यालय असे नांव देण्यात आले आहे. इंदूर शहराला सर्व सोयीने उपयुक्त प्रगतिशील असे शहर बनविले. महाराष्ट्रातील सोलापूर विद्यापीठाचे नवीन नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ ठेवण्यात आले आहे. १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने अहिल्यादेवी स्मृतीस अभिवादन म्हणुन पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार महान समाजधुरिण नानाजी देशमुखांना दिला. अशा सोज्वळ, न्यायप्रिय अहिल्यादेवींना इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी भारताच्या कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गरिट असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गरिट यांच्याशी तुलना केली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नांव सर्व प्रथम लिहिले जाईल. ही त्यांच्या चांगुलपणाची पावती म्हणायला हरकत नाही.

या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की, ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवींना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बऱ्याच काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची ने-आण करत असतांना चोर व दरोडेखोर त्यांची लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी भिल्ल लोकांना त्यापासून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करीत असे.

**-प्रविण बागडे**
**नागपूर**

# सामाजिक जीवन सर्वसमावेशक करूया

प्रत्येक माणसाच्या जीवनात वैयक्तिक जीवनासोबत सामाजिक जीवनाला सुद्धा अनन्यसाधारण महत्त्व आहे. जगातल्या अनेक समाजशास्त्र तज्ञांनी वारंवार सांगितले आहे की, मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे .. समाजप्रिय प्राणी आहे. मनुष्य आपले जीवन एकटेपणाने जगू शकत नाही. जगातल्या प्रत्येक व्यक्तीला समाजात जगावे लागते. सामाजिक जीवन हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. समाजामध्ये वेगवेगळे पंथ, संप्रदाय, जात, धर्म अंतर्भूत असतात. सामाजिक जीवन हे सर्व प्रकारच्या पंथ, संप्रदाय, जात, धर्म यांच्या असण्याने, त्यांच्या गुणवैशिष्ट्याने, त्यांच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीने समृद्ध होत असते. सर्वांचा मिळून समाज तयार होत असतो. हे सामाजिक जीवन शांततापूर्ण, आनंदमय आणि समृद्ध असणे प्रत्येक व्यक्तीसाठी आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक व्यक्तीचे विचार आणि वर्तन हे सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. असे असतानाही दिवसेंदिवस वाढत असणारी धर्मांधता, जातीय कट्टरता चिंता वाढवणारी बाब ठरत आहे. एका गझलकाराने वाढत्या कट्टरतेबद्दल खंत व्यक्त करताना लिहिलेल्या काही ओळी आठवतात...

सापासमान येथे टाकून कात आहे
तुझ्या-माझ्यात अजुन ही जिवंत जात आहे
झाली किती भयानक धर्मांधता अघोरी
ती माणसात घुसूनी माणूस खात आहे

जातीय, धार्मिक कट्टरतेमुळे समृद्ध, सुखमय आणि आनंददायी सामाजिक जीवन धोक्यात आले आहे. ही येणाऱ्या भविष्यकाळासाठी धोक्याची घंटा आहे. ही कट्टरता मनात ठेवून पुढची पिढी वाढत आहे. कळत-नकळत आजची निरागस बालके, निष्पाप लेकरे सध्या परपस्पर जाती-धर्मांबदलच्या द्वेषाचे विष डोक्यात साठवत असल्याने मोकळ्या मनाने, सर्वसमावेशक विचाराने आणि सामंजस्याने एकत्र राहताना, मैत्रीभाव जपताना दिसतील का...? यावर चिंतन होणे आवश्यक आहे. परंतु यावर कोणीही गांभीर्याने विचार करण्यासाठी तयार नाही. प्रत्येकजण आपल्या खोट्या सांप्रदायिक, पंथीय, जातीय आणि धार्मिक दुराभिमानामध्ये अडकून पडला आहे. दिवसेंदिवस या सगळ्या गोष्टीचे दुष्परिणाम सामाजिक जीवनावर दिसत आहेत. आजच्या क्षणाला माणूस म्हणून सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. जात, पात, पंथ, धर्म, वंश यापेक्षा देश मोठा असतो. ही भावना जनमानसामध्ये रुजणे अत्यंत आवश्यक झाले आहे. मी प्रथमतः आणि अंतिमतः भारतीय आहे. माझी जात, माझा धर्म हा माझ्या घरापुरता मर्यादित आहे. सामाजिक जीवन जगत असताना मी फक्त या भारताचा सुजाण नागरिक आहे याची जाणीव प्रत्येक व्यक्तीने ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या संप्रदाय, जात, धर्म, वंश यांच्या बद्दल वाटणारा जिव्हाळा, आपुलकी, प्रेम, अभिमान सहाजिक आहे. तो मर्यादित प्रमाणात प्रत्येकाला असावा. परंतु दुसऱ्या जात, धर्म, संप्रदाय यांच्या विषयी द्वेष, तिरस्कार, कटुता बाळगण्याचा कुणालाही कोणताही अधिकार नाही. आपल्या जातीच्या, धर्माच्या समृद्ध परंपरा.... आपल्या जाती-धर्माचा दैदिप्यमान इतिहास यामधून प्रत्येक व्यक्तीने आदर्श घेऊन चांगल्या प्रकारचे सामाजिक जीवन जगणे अपेक्षित असते. जगाच्या पाठीवर जेवढे धर्म व जेवढ्या जाती अस्तित्वात आहेत त्या प्रत्येक धर्माची, जातीची शिकवण ही मानवता हाच खरा धर्म आहे, आणि माणुसकीने जगणे हे आपले माणूसपण आहे. हे सांगत असते.

मानवता हाच खरा धर्म आहे. अशी जगाला शिकवण देणाऱ्या आमच्या देशात आजच्या काळात मानवता आणि माणुसकी हरवली आहे हे स्पष्टपणे दिसत आहे. आज माणुसकी आणि मानवता याचा अर्थ लोकांना सांगावा लागत आहे. माणसाने जनावराप्रमाणे वागू नये... तर माणसाने माणसासारखे वागणे म्हणजेच माणुसकी. आणि हे माणूसपण जपणारी बाब म्हणजे मानवता धर्म..... मला माझ्या गझलेच्या काही ओळी आठवतात.

रामात तोच आहे, आल्लात तोच आहे
वाटू नका कुणीही धर्मात ईश्वराला ....
धर्मामध्ये कशाला वाटून हात घेता
कोंडू नका कुणीही जातीत ईश्वराला ....

खरे पाहता माणूस म्हणून आपण सर्वजण एक आहोत, सारखे आहोत. ह्याच मनुष्यत्वाचा विचार करून आपण एकरूपतेने व एकसंघतेने राहणे गरजेचे आहे. 'वसुधैव कुटुंबकम', 'हे विश्वचि माझे घर'..... याप्रमाणे प्रत्येक मानवी जीव हा माझा कुटुंबातील सदस्य आहे. ही भावना मनात रुजली पाहिजे. किमान या देशाचा.... या राज्याचा नागरिक हा माझा बांधव आहे. हा विचार थोर महापुरुषांनी आपल्याला दिलाय.... तो विचार आपण सर्वांनी जपला पाहिजे.... आणि भविष्याच्या पिढीला दिला पाहिजे. ज्याप्रमाणे कुटुंबात एकी असेपर्यंत ते कुटुंब सुखात असते... आनंदात असते.... समृद्ध असते.... अगदी त्याचप्रमाणे मनुष्य म्हणून... मानव म्हणून... माणूस म्हणून आपण जोपर्यंत एक राहू तोपर्यंतच आपल्याला आनंद मिळणार आहे. कुटुंबात मतभेद झाले. मतभेदाचे रुपांतर मनभेदात होऊन नंतर कुटुंब वेगळे झाले की, पुढे जी कटूता भावा-भावात निर्माण होते.... ती कधीच कमी होत नाही.... ती दिवसेंदिवस वाढत जाते..... तशाच पद्धतीने समाज हे कुटुंब आहे आणि या कुटुंबात मतभेदाचे रुपांतर मनभेदात झाले की, समाजाचे छोटे-छोटे तुकडे होतात... आणि मग एकसंघ समाजाची विदारक अवस्था होते. विभक्त झालेल्या समाजामध्ये एकसंघ समाज व्यवस्थेमधला आनंद संपून जातो. समाजाची एकसंधता टिकवून ठेवण्यासाठी सामाजिक सर्वसमावेशकता आणि सामाजिक ऐक्य जपावे लागेल.

खरे पाहता सर्वसामान्य माणसे ही गुण्यागोविंदाने, आनंदाने एकमेकांना सहकार्य करत सामाजिक जीवनात एकत्रितपणे जगत आहेत. आपले दैनंदिन व्यवहार सांभाळत असताना कोणताही सर्वसामान्य माणूस जातीचा, धर्माचा, वंशाचा विचार करून आपले जीवन जगत नाही. आपल्या सर्वांचे जीवन एकमेकांशी निगडित आहे. एकमेकांवर अवलंबून आहे. एकमेकांच्या सहकार्याने ते आनंदी होत आहे. प्रत्येक समाज घटकाचे सामाजिक जीवनामध्ये अमूल्य असे योगदान आहे. प्रत्येक समाज घटकाच्या सहभागामुळे सामाजिक जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध झालेले आहे. याची जाणीव प्रत्येक सर्वसामान्य माणसाला आहे. म्हणूनच विश्वासाने एकमेकांचा हात हातात घेऊन सामाजिक जीवनात अनेक वैविध्य असणारी माणसे एकत्र येऊन सुखा-समाधानाने जीवन जगताना पाहायला मिळतात.आजच्या ही सामाजिक जीवनामध्ये सर्वसामान्य माणसे माणूस म्हणून एकमेकाशी चांगलेच वागतात. विनाकारण कोणत्याही गोष्टीमुळे एकमेकांचे एकमेकांशी वादविवाद किंवा भांडण नाही. आजही समाजात वेगवेगळ्या घटकांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध असल्याचे पाहायला मिळते. आजही लोक एकमेकांचे जिवाभावाचे मित्र आहेत. स्वतःच्या प्राणापेक्षा दुसऱ्यावर प्रेम करणारी माणसे आहेत. दुसऱ्याच्या सुखाची, दुसऱ्याच्या हिताची विचार करण्याची परंपरा आजही आबादित आहे.

फक्त काही बोटावर मोजण्या एवढी समाजकंटक माणसे आहेत जी माणसा-माणसांमध्ये भेद निर्माण करतात. स्वतःच्या हितासाठी.... स्वतःच्या स्वार्थासाठी... किंवा आपल्या अज्ञानामुळे, गैरसमजुतीमुळे जातीमध्ये, धर्मामध्ये, वंशामध्ये, पंथांमध्ये माणसांची विभागणी करतात. एक मनाने नेक मनाने राहणाऱ्या समाजाला आपल्या स्वार्थासाठी वेगवेगळ्या गटात विभागून टाकतात. एकमेकांमध्ये द्वेष, तिरस्कार निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. छोट्या-छोट्या मतभेदांचा वापर करून माणसा-माणसांमध्ये मनभेद घडवून आणतात.

- मयूर मधुकरराव जोशी

## संक्षिप्त

### नेपाळचे राजदूत शंकर प्रसाद शर्मा यांची वेरुळला भेट



**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ खुलताबाद/** तालुक्यातील वेरुळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरास शनिवारी (दि.३१) नेपाळचे राजदूत शंकर प्रसाद शर्मा यांनी भेट देवुन घृष्णेश्वराचे दर्शन घेतले. या प्रसंगी देवस्थान तर्फे नेपाळचे राजदूत शर्मा यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला,यावेळी देवस्थानाचे विश्वस्त राजेंद्र कोशिके,दीपक शुक्ला,मिलिंद शेवाळे यांची उपस्थिती होती.

### गिरजा माता विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा



**आत्ताच एक्सप्रेस**

**आडुळ/विशेष प्रतिनिधी/**शिरोडी खुर्द येथील गिरजा माता विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा २००४ ते २००५ दहावीच्या वर्गातील माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहात स्नेहसंमेलन साजरे केले, वास्तविक पाहता दहावीनंतर एकत्र येणे आपआपले सुखदुःख आपल्या बाल मित्रांना सांगणे यात खूप आनंद आहे, त्यावेळी दहावी वर्गातील या कार्यक्रमाचे आयोजक सचिन आटोळे. सुनील पाटील. ज्ञानेश्वर भागवत. सतीश वाहटुळे.या दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे काम केले, शिक्षकांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.तब्बल २० वर्षांनी विद्यालयात परस्परांना भेटताना सर्वांना आनंदाने भरून आले होते, सर्व विद्यार्थी विद्यालयात जमा झाल्यानंतर सुरवातीला शिक्षकांचे फुलांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले परस्परांच्या कौटुंबिक व व्यावसायिक माहितीची देवाणघेवाण झाली,प्रास्ताविक गणेश साळुंखे यांनी केले, त्यानंतर विद्यार्थी व शिक्षक यांनी मनोगत व्यक्त केले बऱ्याच विद्यार्थ्यांना मनोगत व्यक्त करताना जुन्या काळातील आठवणींनी भरून आले होते.मनोगत व्यक्त केल्यानंतर वर्गातील मृत्यू झालेल्या विद्यार्थी व शिक्षकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.शाळेच्या स्थापनेपासून प्रथमच एक कल्पक व नाविन्यपूर्ण उपक्रम या तुकडीने राबवला या उपक्रमाची दखल घेऊन इतर विद्यार्थ्यांनी विद्यालयात नवीन सोईसुविधा उपलब्धता होण्यास मदत होईल असे मत कदम सर यांनी व्यक्त केले.कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कदम सर .जेव्हेरी सर. बनसोड सर उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम सचिन आटोळे.सुनील पाटील.ज्ञानेश्वर भागवत .प्रमुख पाहुणे आहेर सर, व सतीश वाटोळे, बिगोद सर. यांनी आभार मानले.

### शिवसेना ओबीसी व्हीजेएनटीच्या जिल्हाध्यक्षपदी विकास सर यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील सारोळा येथील विकास सुसर यांची शिवसेना ओबीसी व्हीजेएनटीच्या युवक जिल्हा अध्यक्ष पदी निवड दिनांक ३१/०५/२०२५ रोजी लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे ओचित्य साधुन शिवसेना पक्षाचे मुख्य नेते महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री श्री .एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार ओबीसी व्हीजेएनटी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब (राज्य मंत्री दर्जा ) शेळी मेंढी पालन महामंडळाचे उपाध्यक्ष



यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरी भाऊ जानराव युवक मराठवाडा अध्यक्ष यांना विश्वासात घेऊन जिल्हा अध्यक्ष दत्ता भाऊ म्हेत्रे यांनी सामाजिक कार्यकर्ते श्री विकास सुसर यांची ओबीसी व्हीजेएनटी युवक जिल्हा अध्यक्ष छत्रपती संभाजीनगर पदी निवड केली. सुसर यांनी गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक संघटनेच्या माध्यमातून पोलीस,शेतकरी सामाजिक,धार्मिक तसेच ओबीसी व्हीजेऐनटी समाजाच्या न्याय हक्कासाठी अनेक वेळा लढा दिला आहे निवडी वेळी जिल्हा उपाधाक्ष नारायण भाऊ रीठे पुष्पा ताई मुंडे मराठवाडा अक्ष्यक्षा महिला आघाडी प्रीती ताई साहेब मीराताई जानराव आदि पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते व परिसरात त्यांचे कौतुक होत आहे

### श्री मुक्तानंद महाविद्यालय, येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर येथे शनिवार दिनांक ३१ मे २०२५ रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. विशाल साबणे, प्रबंधक डॉ. विजय आहेर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय अधिकारी यांची उपस्थिती होती.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे एमआयडीसी चिकलठाणा परीसरात स्वच्छता अभियान

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत या थीमवर प्लास्टिक प्रदूषणाबाबत जनजागृती करणे, एकल वापराच्या प्लास्टिकसह प्लास्टिकचा वापराचे प्रमाण कमी करणे व यासाठी शाश्वत पर्याय विकसित करणे. या तत्वावर आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे माननीय आयुक्त तथा प्रशासक जि. श्रीकांत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख मा. श्री. विजय पाटील साहेब यांच्या नियोजनात महानगरपालिकेने चिकलठाणा एमआयडीसी परिसरात संपूर्ण स्वच्छता अभियान राबविले.

यात मुखत्वे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालय ०५ व ०६ चे सर्व स्वच्छता कर्मचारी-अधिकारी यांनी ही मोहीम पूर्णत्वास नेली.या मोहिमेमध्ये चिकलठाणा एमआयडीसी परीसरात सर्व मुख्य रस्ते गरवारे कंपनी ते नारेगाव चौक, कलाग्राम ते एपीआय कॉर्नर, धूत हॉस्पिटल ते प्रोझोन, कलाग्राम ते एनआरबी बेरिंग, सिपेट ते नारेगाव चौक, तसेच एमआयडीसी परिसरातील सर्व अंतर्गत रस्त्यांवर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच या भागातील रहिवासी कॉलोनी ज्यात मिलेनियम पार्क, फ्लेमिंगो सोसायटी, इ चा परिसर सुध्दा स्वच्छ करण्यात आला.

महानगरपालिकेचे जवळपास ४०० कर्मचारी यात सहभागी होऊन कचरा संकलन करण्यात आला ज्यात ५८ टन अतिरिक्त ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला तसेच पावसामुळे पडलेल्या झाडांचा हिरवा कचरा सुद्धा यावेळी जवळपास ६ टन उचलण्यात आला, बांधकाम कचरा राडारोडा हे २३ टन उचलण्यात आले. हा सर्व गोळा केलेला कचरा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात




आला तसेच बांधकाम कचरा खाम नदी येथे पाठविण्यात आला.यावेळी पर्यावरण रक्षणाची तसेच प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी शपथ घेण्यात आली तसेच प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी व प्लास्टिकचा शाश्वत पर्याय बद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.ही मोहीम यशस्वी करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री. विजय पाटील यांनी विशेष प्रयत्न घेतले तसेच सहाय्यक आयुक्त श्री. अर्जुन गिराम, सहाय्यक आयुक्त श्रीमती अर्चना राजपूत, सहाय्यक आयुक्त श्रीमती प्राजक्ता वंजारी, रेड्डी कंपनीचे मुरली रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सचिन भालेराव, विशाल खरात, किरण जाधव, चेतन वाघ, गीतांजली कौशिक, अर्चना पाटील, क्षेत्रीय कार्यालय ०५ व ०६ चे स्वच्छता निरीक्षक सुरज भंडारी, अतिष खरात, राजेद्र त्रिभुवन, हरीश मिसाळ, रोहित गायकवाड, राहुल बोर्डे, अर्पिता होशीळ, रितेश सौदे, सचिन शिंदे, विकास भाले, अक्षय भाले, रेड्डी कंपनीने दिनेश बियाणी, सतिष तळेकर, तसेच स्वच्छता जवान,स्वच्छता कर्मचारी, रेड्डी कंपनीचे कर्मचारी, इ उपस्थित होते.

## श्री अविनाश गर्डे यांना महाराष्ट्र रत्न समाजभुषण पुरस्कार प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिपंळवाडी/प्रतिनिधि/हारुन शेख/** ए.डी. फाऊंडेशनचे महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मोत्सव निमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय समाजरत्न गौरव पुरस्कार सोहळा रविवार, २५ मे रोजी निर्मिती लॉन्स, सोलापूर येथे धनगर समाजाचे नेते मा आ प्रकाश आण्णा शेंडगे, सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ प्रा यशपाल भिंगे, अशोक गोरड , महादेव महानोर यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला फाऊंडेशन वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

महाराष्ट्र रत्न सन्मान भुषण पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, उपाध्यक्षा ज्योती




भाभी ठाकुर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे, विद्या सभा अध्यक्ष डॉ जयंत जोशी, विजय चाटुपळे, प्रा उमेश जगताप, डॉ पद्मकुमार कासलीवाल, जुगलकिशोर लोहिया, डॉ राम लोंढे, केदार मंत्री, व्यंकटेश गोसावी, दिपक ठाकुर, मुख्याध्यापक भास्करराव कुलकर्णी, मुख्याध्यापिका सुषमा मोरगावकर, बालिकाताई देशमुख, अमोल गोरकर यांच्या सह अनेक क्षेत्रातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**महाराष्ट्राला कर्तृत्ववान महिलांची परंपरा आहे :- प्रा यशपाल भिंगे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श आपण सदैव समोर ठेवावा. प्रतिकूल परिस्थितीतही बळ येते. होळकर घराण्याने ज्याप्रमाणे घरातील महिलांना स्वातंत्र्य दिले, त्याचप्रमाणे आपणही महिलांना स्वातंत्र्य द्यावे. महिला चांगले काम करू शकतात, याचा आदर्श आपल्यापुढे आहे. त्याकरिता समाजातील सर्व युवक युतीने पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

### लोणवाडी येथील गावकरी ग्रामपंचायतच्या वतीने माणिक सुलताने सैनिक यांचा सत्कार




**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/प्रतिनिधी/** सिल्लोड तालुक्यातील लोनवाडी येथील मानिक सुलताने सैनिक यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मानिक सुलताने भारतीय सेनेमध्ये कार्यरत आहेत. नुकत्याच पहलगाम व सिंदूर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मानिक एकनाथ सुलताने यांनी आपले मोलाचे सहकार्य केले. त्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता भारतीय सीमेवर कार्य ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच ग्रामसेवक यांनी वीर जवानांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. आपल्या भारत देशाला अशाच वीर जवानांची गरज आहे जे जिवाची पर्वा न करता कार्य करत असतात, यावेळी ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गांवकरी आदींची उपस्थिती होती.

### तालुकास्तरीय मुख्याध्यापक कार्यप्रेरणा बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस/ जिंतूर (प्रतिनिधी- सौ अश्विनी जोशी)** मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, शिक्षणाधिकारी (प्रा.) सुनील पोलास यांच्या संकल्पनेतून तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी उन्हाळी सुट्टीनंतर सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षामध्ये दर्जेदार पोषण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या निर्धारित उद्दिष्टाच्या साध्यतेसाठी सर्व मुख्याध्यापक बांधवांना प्रेरित करणे महत्त्वाचे आहे. मुख्याध्यापकांना समजून घेऊन त्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय समस्या सोडविणे हे आपले कर्तव्य आहे. असे समजून सर्व मुख्याध्यापकांशी संवाद साधण्याच्या हेतूने.... त्यांच्या कार्याला प्रेरणा देण्याच्या हेतूने.... नवीन शैक्षणिक सत्र सुरु होण्याच्या १५ दिवस आधी म्हणजे दिनांक ३० मे २०२५ रोजी तालुकास्तरीय मुख्याध्यापक कार्यप्रेरणा बैठकीचे आयोजन श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालय येथे करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्तेविषयी प्रचंड तळमळ असणारे .... शैक्षणिक गुणवत्तेसाठी सातत्याने प्रयत्नशील असणारे, शैक्षणिक गुणवत्तेचे प्रतिक समजले जाणारे संजय ससाणे शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली सदरची बैठक संपन्न झाली.कार्यप्रेरणा बैठकीला संबोधित करताना शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांनी सर्वांना आपल्या विचाराने प्रेरित केले.

## तंबाखुमुक्ती जनजागृती बाईक रॅलीस प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या अंतर्गत तंबाखू विरोधी दिनानिमित्त आज जिल्हा रुग्णालय संभाजीनगर व मेडिकव्हर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीस शहरवासियांनी उत्तम प्रतिसाद दिला व तंबाखुमुक्तीची शपथ घेतली. या रॅलीत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, डॉ. दिपेन शहा, वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश लड्डा, दंत चिकित्सक डॉ.अनिता खरात यांनी सहभाग नोंदवला.

मेडिकव्हर हॉस्पिटलच्या आवारात सर्व सहभागी वाहनचालकांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. प्रतिकात्मक व्यसनमुक्तीसाठी बलून सोडण्यात आले.

जनजागृती पर बाईक रॅली काढण्यात आली त्यामधून व्यसनमुक्ती व व्यसनाचे दुष्परिणाम याची जनजागृती पर बॅनर्स दर्शवण्यात आले. उपस्थित सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करुन आपला पाठिंबा दर्शवला. उपस्थित सदस्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने डॉ पूनम गिरी, शिल्पा




गडकर, वेद शुक्ला, जयदीप रनसिंग यांचे सहकार्य लाभले. रॅलीमध्ये डॉ.जावेद कुरेशी, चंदन गणोरे, डॉ.रवींद्र बोर्डे, डॉ. सूर्यवंशी, श्री.योगेश सोळुंके, श्रीमती निकिता गायकवाड, महेश रोडगे, महेश मरकड, विश्वजीत सोनटक्के, विजय इंगळे, लक्ष्मीकांत माळगे, करण पवार, निलेश लोखंडे, विविध आरोग्य संस्थेचे समन्वयक व मेडिकव्हर हॉस्पिटल मधील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तसेच मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेच्या डॉ. निकिता गायकवाड यांनी स्वाक्षरी मोहीम घेतली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० वी जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील श्री क्षेत्र वेरूळ येथील शिवतीर्थ कुंडावर पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० वी जयंती आमदार प्रशांत बंब, आमदार संजय केणेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली दरम्यान मान्यवरांचे हस्ते महाआरती करण्यात आली.शनिवार दि. ३१ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली खुलताबाद तालुका भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.त्या अनुषंगाने मान्यवरांचे हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व तदनंतर महाआरती करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे यांनी केले तर भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, घृष्णेश्वर देवस्थान समिती अध्यक्ष राजेंद्र कौशिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तर आमदार संजय कणेकर यांनी अध्यक्षीय भाषण केले.

या वेळी बोलताना ते म्हणाले की, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्यात आला त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला सतीची प्रथा बंद करण्यात आली, अनेक मंदिराचा जीर्णोद्धार त्यांनी केला आज शेतीचा जो ७/१२ आहे तो त्यांनी सुरू केलेला आहे.अशा प्रकारे त्यांच्या कार्याचा गौरव आमदार केनेकर यांनी त्यांच्या भाषणात केला.यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे,भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण,भाजपा गंगापूर तालुकाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सुरेश शिंदे, गंगापूर खुलताबाद विधानसभा निवडणूक प्रमुख विकास कापसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव,माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील नलावडे,जिल्हा परिषद माजी सभापती भीमराव



खंडागळे, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, शहराध्यक्ष परसराम बारगळ, सुरेश मरकड माजी नगरसेवक योगेश बारगळ,सतीश दांडेकर, अविनाश कुलकर्णी, करणसिंग गोमलाडु, आमदार प्रशांत बंब यांचे स्वीय सहाय्यक गोपाल वर्मा,राहुल निकुंभ,विजय राठोड,सुखदेव ठेंगडे, सागर मातकर,विलास काळे, रावसाहेब देशमुख,राजेंद्र बढे, अरुण पाटे, संतोष राजपूत, अनिल करपे, सुनील पवार,किरण बोडखे,अमोल गवळी, शिवाजी गायकवाड, बाळु नलावडे,आनंदा काटकर,कचरु भोसले, राजेंद्र राठोड, सुभाष ठोंबरे,तायडे, सुखदेव वेताळ , यांच्या सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अहिल्याबाईंचे कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे - रावसाहेब पाटील दानवे





**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष, जालना महानगरतर्फे आज सकाळी भव्य मॅरेथॉन व वॉकाथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

पहाटे ६ वाजता सुरू झालेल्या या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेमध्ये महिलांसह पुरुष, युवक-युवती व लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली असून, अहिल्यादेवींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपाचे जेष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, जालना ग्रा.जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून भाजपाचे जेष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे उपस्थित होते. त्यांनी या प्रसंगी बोलताना अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. अहिल्यादेवी होळकर या केवळ एक आदर्श स्त्री प्रशासक नव्हत्या, तर त्यांनी आपल्या कार्यातून सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि स्त्री सबलीकरणाचे मूर्त उदाहरण निर्माण केले, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीने प्रेरणा घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या पुढाकाराने आणि आयोजनाखाली भव्य मॅरेथॉन व वॉकाथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या प्रारंभी दानवे यांनी उपस्थितांना थोर समाजसुधारक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याची थोडक्यात माहिती दिली. त्यांनी अहिल्यादेवींनी केलेल्या सामाजिक कार्य, न्यायप्रिय राज्यकारभार व स्त्रीसशक्तीकरणासाठी दिलेल्या योगदानाचे महत्व पटवून दिले. समाजप्रबोधन आणि जनहित हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

भाजपकडून भविष्यातही अशा उपक्रमांचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात येईल, जेणेकरून तरुणाईला प्रेरणा मिळेल आणि सामाजिक भानही निर्माण होईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे त्यांनी मन:पूर्वक आभार मानले व अशा सकारात्मक उपक्रमात पुढील काळात अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही केले.

या मॅरेथॉन व वॉकाथॉन स्पर्धेमध्ये विविध वयोगटातील नागरिकांनी सहभाग घेतला. विशेषत: महिलांची उपस्थिती प्रेरणादायी व उल्लेखनीय ठरली. महिलांचा उत्साह, जिद्द व सहभाग समाजातील बदलत्या मानसिकतेचे प्रतीक ठरला तसेच फिटनेस ग्रुप्स व आरोग्यप्रेमींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी भाजप महानगर टीम, कार्यकर्ते, स्वयंसेवक, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग व स्वयंसेवी संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात आरोग्यविषयक जनजागृती, एकात्मता, राष्ट्रप्रेम आणि महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

जालन्यात भरलेल्या या उत्साही, अनुशासित आणि सामाजिक संदेश देणाऱ्या उपक्रमामुळे अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची आणि कार्याची आधुनिक काळातील पुनः प्रस्थापना झाली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# कापूस व्यापाऱ्याने फसवल्याने शेतकऱ्यांचा सामूहिक आत्मदहनाचा इशारा



**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकर/प्रतिनिधी/** तालुक्यातील रेणापूर व बटाळा गावातील सोळा शेतकऱ्यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भोकर यांना निवेदन देऊन सामूहिक आत्मदहणाचा इशारा दिल्याने नागरिकांन मधे चर्चेला उधाण आले आहे.सविस्तर वृत्त असे की रेणापूर या गावातील कापूस व्यापारी, प्रकाश बाबुराव बिरगाळे हा गेल्या पाच वर्षा पासून भोकर दिवशी रोडवर स्वतःच्या शेतात विनापरवाना कापूस खरेदी केंद्र चालू केले. या मधे प्रकाश रावांचा चांगलाच जम बसला या कामासाठी त्यांची पत्नी व मुलांचा ही सहभाग होता. बघता बघता परिसरात प्रकाशरावांचा चांगलाच बोलबाला झाला. रोज दहा वीस मजूर काम करू लागले दिवसातून पाच ते दहा गाडी कापूस खरेदी विक्री होऊ लागला. आणी अती विश्वासाने शेतकरी कापूस द्यायचे आणी महिना दोन महिन्या नंतर कापसाची रखम घेऊन जायचे, प्रकाशरावांनी रेणापूर येथे वीस पंचवीस लाख रुपये खर्च करून टूमदार बंगला बांधला, पण काय झाले कुणास ठाऊक २०२४ मधे कापसाची जोरदार खरेदी केली.

आणी शेतकऱ्यांना पैशा साठी फिरवा फिरवी सुरु केली.पैसे मागायला गेलेल्या शेतकऱ्यांना उद्धट बोलणे सुरु केले. कोणी पैशा साठी तंबी दिली तर, आमच्या कडेच पैसे नाहीत कुठून द्यायचे, आले तेंव्हा देतो, आम्हाला काही बोलायचे नाही नाहीतर तुमच्या नावाने चिठ्ठी लिहून मी आत्महत्या करतो. अश्या प्रकारे धमकी देऊ लागले, म्हणून रेणापूर येथील काही शेतकऱ्यांनी कायदेशीर मार्ग काढीत भोकर पोलिसात तक्रार दिली. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी बसून मिटवले शेतकऱ्याना पैसे देण्यासाठी तारीख देऊन प्रकाशराव व इतरांनी १०० रुपयांच्या बॉण्ड पेपर वर करार केला. करार करून ६ महिने उलटले परंतु एक नया पैसा मिळाला नाही.

सहाय्यक निबंधक, मार्केट कमिटी, पोलिस स्टेशनं यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही. पेरणी आली बिया भरणाची व्यवस्था नाही. कोणी कर्ज देत नाही.या विवंचनेत अडकलेल्या रेणापूर व बटाळा येथील सोळा शेतकऱ्यांनी आठ दिवसात पैसे न दिल्यास भोकर कृषी उत्पन्न बाजार समिती समोर राजेश मानपुरे,तुकाराम भगत, राजेश हमदं,अविनाश पेरकेलवाड, साईनाथ पेरकेलवाड,मानेजी कंधारे,गंगाधर पपुलवाड,साईनाथ मानपुरे,इब्राहिम पठाण, नारायण कोंडेवाड,दत्ता मानपुरे, बालाजी मानपुरे,गणपतराव हमदं सर्व राहणार रेणापूर व बालाजी गायकवाड, केशव पवार बटाळा या सोळा शेतकऱ्यांनी सामूहिक आत्मदहणाचा इशारा दिला आहे.

निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, कृषिमंत्री, जिल्हाधिकारी नांदेड, पोलीस अधीक्षक नांदेड, उपविभागीय अधिकारी भोकर, अप्पर पोलीस अधीक्षक भोकर, तहसीलदार भोकर, पोलीस निरीक्षक भोकर, कृषिउत्पन्न बाजार समिती भोकर यांना दिल्या आहेत. संबंधित व्यापाऱ्यावर कार्यवाही होऊन शेतकऱ्यांना पैसे मिळतील की प्रशासन होणार आंदोलन बघतच राहील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्रातील कोविड रुग्णांच्या संख्येत वाढ

**मुंबई/प्रतिनिधी/** शनिवारी महाराष्ट्रात कोरोना विषाणू संसर्गाचे ८४ नवीन रुग्ण आढळले आहेत. यासह, वर्षाच्या सुरुवातीपासून नोंदवलेल्या एकूण रुग्णांची संख्या ६८१ झाली आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने ही माहिती दिली. राज्य सरकारने एका निवेदनात म्हटले आहे की बहुतेक रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे आहेत आणि लोकांना घाबरण्याची गरज नाही. पूर्वीच्या अहवालात असे म्हटले होते की कोरोना विषाणूचे चार नवीन प्रकार पसरत आहेत. हे सर्व ओमिक्रॉनचे उप-प्रकार आहेत. ते खूप वेगाने पसरतात.

देशाची आर्थिक राजधानी मुंबईतील नवीन प्रकरणांपैकी मुंबईत ३२ नवीन प्रकरणे नोंदवली गेली आहेत. मुंबईत २७ नवीन प्रकरणे नोंदली गेली होती पण त्यामध्ये वाढ झाली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'लोकराज्य'चा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावरील विशेषांक प्रकाशित




**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी/** अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने त्यांच्या जीवन कार्यावर आधारित 'लोकराज्य' च्या विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले.चौंडी येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सव सोहळ्यात आयोजित या प्रकाशन सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार शिवाजी कर्डीले, आमदार नारायण पाटील, आमदार अमोल खताळ, आमदार चित्रा वाघ, आमदार काशिनाथ दाते, आमदार मोनिका राजळे, आमदार सुरेश धस, माजी आमदार अण्णासाहेब डांगे, माजी आमदार रमेश शेंडगे, प्रा.लक्ष्मण हाके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक आणि 'लोकराज्य'चे मुख्य संपादक ब्रिजेश सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली या अंकाची निर्मिती करण्यात आली आहे. अंकाच्या मुखपृष्ठावर जन्म त्रिशताब्दी निमित्ताने तयार करण्यात आलेले बोधचिन्ह आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य, त्यांचे महाराष्ट्रातील कार्य, धर्मपरायणता, समाजकार्य, राज्यकारभाराचा आदर्श, दातृत्व, त्यांनी उभारलेल्या विविध वास्तूंची माहिती अंकात देण्यात आली आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनाविषयी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह विविध मान्यवरांनी लिहिलेले लेख अंकात समाविष्ट आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेसह शासनाने जन्म त्रिशताब्दी उत्सवानिमित्त घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांची माहिती देखील या अंकात देण्यात आली आहे.

# परळी वैद्यनाथ मंदिराच्या नवीन दर्शन मंडपातच शिजवले मांसाहारी अन्न, घटना कॅमेऱ्यात कैद



**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी/प्रतिनिधी/** परळीतील वैद्यनाथ मंदिर परिसरात सध्या तीर्थक्षेत्र विकासाची बांधकामे सुरु आहेत. मात्र वैद्यनाथाच्या पूर्व प्रवेशद्वारावरच कंत्राटदाराकडे कामाला असलेल्या कामगारांनी नियोजित दर्शन मंडपातच चुल मांडून आम्लेट आणि मांसाहारी अन्न शिजवल्याचा प्रकार प्रकार समोर आला आहे. शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे आणि भारतीय जनता युवा मोर्चाचे पदाधिकारी योगेश पांडकर यांनी हा सर्व प्रकार कॅमेरात कैद केला आहे.

मंदिर परिसरात कामे करतांना ऐतिहासिक, धार्मिक महत्व लक्षात घेवून कामे करावी अशा वारंवार सुचना लोकप्रतिनिधी देत असतात. मात्र, तरीही दर्शन मंडपातच चुल मांडून आम्लेट आणि मांसाहारी अन्न शिजवल्याचा प्रकार प्रकार समोर आला आहे. खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवारांनी याच इमारतीच्या बाजूला असलेल्या पायऱ्यांबाबत सबंधित गुत्तेदाराला खडे बोल सुनावले होते. आता तर वैद्यनाथ मंदिराच्या परिसरात धार्मिकदृष्ट्या निषिद्ध मानल्या जाणाऱ्या ठिकाणीच मांसाहार शिजवल्याचा प्रकार पुढे आला आहे.

वैद्यनाथ मंदिर भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक

परळी येथील प्रसिद्ध वैद्यनाथ मंदिर भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. परळीच्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे स्थान जागृत समजले जाते. हे ज्योतिर्लिंग भारतातील महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात असून परळी वैद्यनाथ हे दक्षिण मध्य रेल्वेवरील एक स्थानक आहे. हे मंदिर देवगिरीच्या यादवांच्या काळात त्यांचा प्रधान श्रीकरणाधिप हेमाद्री याने बांधले आहे, असे म्हणतात. पुण्यश्लोक राणी आहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याची माहिती आहे. हे मंदिर चिरेबंदी असून भव्य स्वरुपाचे आहे. मंदिराच्या परिसरात लांबलचक असलेल्या पायर्या आणि भव्य प्रवेशद्वार ही लक्ष वेधून घेण्यासारखी ठिकाणे आहेत. मंदिराचा गाभारा आणि सभामंडप हे एकाच पातळीवर असल्यामुळे सभामंडपातून ज्योतिर्लिंगाचे दर्शन होऊ शकते. इतरत्र कोठेही नाही, पण फक्त वैद्यनाथ इथे देवाला स्पर्श करुन दर्शन घेता येते. मंदिराच्या परिसरात तीन मोठी कुंडे आहेत. मंदिरापासून जवळच तीन किलोमीटर अंतरावर ब्रह्मनदीच्या किनारी ३०० फूट उंचावरील जिरेवाडी येथे सोमेश्वर मंदिर आहे. परळी वैद्यनाथ मंदिर सुमारे २००० वर्षे जुने आहे. या मंदिराचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी १८ वर्षे लागली. सध्याच्या मंदिराचा जीर्णोद्धार इंदूरच्या शिवभक्त महाराणी देवी अहिल्याबाई होळकर यांनी अठराव्या शतकात केला होता. हे तीर्थक्षेत्र अहिल्या देवीला अत्यंत प्रिय होते असंही म्हणतात.

# संक्षिप्त

## पहलगाम हल्ला : राज्यातील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाखांची मदत वितरीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या हल्ल्यात मृत्यू झालेल्या सहा नागरिकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाखांची आर्थिक मदत वितरित करण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत झालेल्या राज्यातील नागरिकांच्या कुटुंबियांना सुरवातीस ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र, नंतर झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही मदत रक्कम वाढवून प्रत्येकी ५० लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार मदत व पुनर्वसन विभागाने मृतांच्या कुटुंबियांना ही आर्थिक मदत वितरित केली.राज्य सरकारच्या या निर्णयामुळे पीडित कुटुंबियांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारकडून मिळालेली ही मदत ही अशा कठीण काळात कुटुंबीयांना थोडा आधार देणारी आहे, अशी भावनाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जन्मत्रिशताब्दी निमित्त राज्यपालांचे अभिवादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती तसेच राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस दलातील अधिकारी उपस्थित होते.

## खुलताबादेत ६८ हजाराचे अंमली पदार्थ जप्त तर विक्री करणाऱ्यास अटक



**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील एका औषधी दुकानावर बटण गोळीची विक्री करतांना पोलीसांनी शुक्रवारी (दि.३०) रात्री कारवाई केल्यानंतर नशा खोरांविरुध्द पोलीस ॲक्शन मोडवर असल्याचे दिसले.

**खुलताबादपोलिस पथकाने गुलाबशाह कॉलनीत छापा टाकत ६८ हजार रुपयांचे एमडी ड्रग्स जप्त केले असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. ही कारवाई निश्चितच प्रशंसनीय आहे. मात्र, नशा विक्रेत्यांविरोधातील पोलिसांची ही ॲक्शन पुढेही सुरु राहील, अशी अपेक्षा शहरातील नागरिकांना आहे.**

खुलताबाद शहरात अंमली पदार्थांची चोरटी विक्री होत असल्याची माहिती पोलीसांना गुप्त बातमीदाराच्या मार्फत मिळताच सहायक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे, बीट जमादार पोलीस शेख जाकीर, गोपनी शाखाचे के. के. गवळी, सिद्धार्थ सदावर्ते यांच्या पथकाने खुलताबाद शहरातील गुलाब शहा कॉलनीत शुक्रवारी (दि.३०) रात्री पावणेबारा वाजता सय्यद इक्बाल याच्या घरावर छापा मारला, सुरुवातीला आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे देणारा इक्बाल याला पोलिसांनी खाक्या दाखविताच घरातील ११.४० ग्रॅम च्या आठ प्लास्टिक च्या पुड्यांमध्ये ६८ हजार, ४०० रुपयांचे एम.डी. पावडर आढळून आले. सदरील माल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी खुलताबाद पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून सय्यद इक्बाल याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.खुलताबाद शहरात नशेखोरी वाढली असून,तरुण पिढी या विळख्यात अडकत आहे,या विरुध्द खुलताबाद पोलीसांनी आता कडक कारवाई करणार असल्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी स्पष्ट केलं.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813